# अर्ज निशाणी क्रमांक १० वर आदेश

## (पारीत दिनांक ०७.१०.२०२५)

०१. प्रस्तूत अर्ज वादीने हस्तांतरणपत्र अपु–या मुद्रांकावर असल्याने आणि नोंदणीकृत नसल्याने ***महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम, १९५८ चे कलम ३३*** अनुसार जप्त करुन अपुरा मुद्रांक दंडासह वसूल करुन घ्यावा यासाठी दाखल केला आहे.

०२. प्रतिवादी प्रस्तुत प्रकरणात हजर राहून सदर अर्जास त्यांचया आक्षेप नसल्याचे कथन केले.

०३. वादीतर्फे विधीज्ञ श्री. जी.पी.गिरी व प्रतिवादीतर्फे श्री. एस.जी.पाटील यांचा युक्तिवाद ऐकला.

०४. वादीचा दावा आणि १०० रूपयाचे स्टॅम्पवर नोटरीकृत हस्तांतरणपत्राचे अवलोकन केले. वादींनी दाव्यातील खरेदीखत कोर्टात दाखल केलेले आहे. ***मालमत्ता हस्तांतरण अधिनियम, १८८१ चे कलम ०९*** अनुसार ज्यावेळी लेखी दस्तऐवज आवश्यक नाही, त्यावेळी तोंडी हस्तांतरण देखील विधिवत असते. ***मालमत्ता हस्तांतरण अधिनियम, १८८१ चे कलम ५४*** अनुसार ज्या वेळी मालमत्तेची किंमत रक्कम रुपये १००/– पेक्षा अधिक असते त्यावेळी मालमत्तेचे हस्तांतरण केवळ नोंदणीकृत दस्तानेच केले जाते. ***नोंदणी अधिनियम, १९०८ चे कलम १७*** अनुसार खरेदीखत सक्तीने नोंद होण्यास पात्र दस्तऐवज आहे. ***महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम, १९५८ चे कलम ३४*** अनुसार कोणताही दस्तऐवज अपु–या मुद्रांकावर केला असेल तर तो पुराव्यात सामील करुन घेता येत नाही.

०५. ***महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम, १९५८ चे कलम ३४*** अनुसार अपुरा मुद्रांक असलेला दस्तऐवज ज्या लोक सेवकासमक्ष हजर केला जाईल त्यांच्यावर दस्तऐवज जप्त करण्याची व पुराव्यात सामील न करुन घेण्याची जबाबदारी ठेवली आहे. अपुरा

मुद्रांक असलेला दस्तऐवज जो पर्यत मुद्रांक पूर्ण भरजा जात नाही तो पर्यत पुराव्यात सामील करुन घेता येत नाही.

**०६.** वादीला वर नमुद हस्तांतरणपत्र पुराव्यात सामील करुन पाहिजे आहे. वादीने अपुरा मुद्रांक आणि त्यावरील दंड भरण्यास तो तयार असल्याचे नमूद केले आहे. म्हणून ठरावपत्र ***महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम, १९५८ चे कलम ३३*** अनुसार जप्त करण्यात येते. वादीने हस्तांतरणपणत्र ***महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम, १९५८ चे कलम ३९ ते ४१*** अनुसार **मुद्रांक जिल्हाधिकारी** यांच्याकडे अपुरा मुद्रांक आणि दंड भरुन नोंदणी करुन घ्यावा. म्हणून अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. म्हणून खालील आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

१. अर्ज **निशाणी क्र.१०** खर्चासह मंजूर करण्यात येतो.

२. हस्तांतरणपत्र अपुरा मुद्रांक आणि दंड भरुन नोंदणी करण्यासाठी मुद्रांक जिल्हाधिकारी, लातूर यांच्याकडे पाठविण्यात यावा.

३. वादीने मुद्रांक जिल्हाधिकारी, यांच्या कार्यालयात हजर राहून पुर्तता करावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by SABALE SHITAL DATTATRAY
Date: 2025.10.10 12:16:55 +0530

**(श्रीमती एस. डी. साबळे)**

**दिनांक :– ०७.१०.२०२५.** **२ रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, औसा,**

**ठिकाण :– औसा.** **जिल्हा लातूर.**